# दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका



Scanned by CamScanner

# दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका

(मराठी त्रैमासिक)

जुलै /ऑगस्ट / सप्टेंबर २००७

**वर्ष : २६ / अंक - दुसरा**

**संपादक : चंद्रकुमार नलगे**

**मुद्रक :** गणेश प्रिंटर्स, कोल्हापूर. २६९५५४५

**मुखपृष्ठ :** गजानन पाटील/सर्जेराव पाटील

मूल्य ४० रूपये

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व किंवा राज्य शासन सहमत असेलच असे नाही.
- या अंकात मांडलेल्या विचारांशी संपादक/संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. या अंकाला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अनुदान प्राप्त.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका

१) कृ. प्र. खाडिलकरांचे 'कीचकवध' :
मराठी रूपकात्मक नाट्यपरंपरेतील मानबिंदू
- प्रा. दत्ता पाटील

२) प्रीतिप्रेमाचे महाकाव्य : 'कबंध'
- डॉ. सुरेश सावंत

३) झाडाझडती देवाच्या साक्षीनं :
धरणग्रस्तांचीच
- प्रा. सुभाष जाधव

४) जागतिकीकरण आणि भाषांतर
- डॉ. रवींद्र भास्कर पाटील

५) मराठी दलित कवितेतील आई
- प्रा. डॉ. सुनील चंदनशिवे

६) परिवर्तनाची अपेक्षा बाळगणारी कविता
- प्रकाश नाईक

**कविता**

ती — गौरी भोगले
बेट — रामकली पावसकर
आपण दोघे — दत्ता हलसगीकर

Scanned by CamScanner

# झाडाझडती देवाच्या साक्षीनं : धरणग्रस्तांचीच

- प्रा. सुभाष गणपती जाधव

आपला देश कृषीप्रधान देश आहे. शेती हा देशाचा कणा आहे. शेतीवरच भारताची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. देशात अनेक पंचवार्षिक योजना राबविल्या गेल्या. या पंचवार्षिक योजनांमध्ये औद्योगिक विकास व शेती विकास या गोष्टींना प्राधान्य देण्यात आले. औद्योगिक प्रगतीला विजेची गरज असते. यासाठी पाणीसाठा मोठा लागतो. तसेच शेती विकासासाठी प्रामुख्याने पाण्याची गरज असते. या दोन्ही गोष्टी साध्य करण्यासाठी धरणे बांधणे गरजेचे होते. त्यामुळे इतर राज्याबरोबर महाराष्ट्रातही अनेक धरणे बांधली गेली. परिणामी औद्योगिक व शेतीचा विकास झाला. हे जरी खरे असले तरी ज्यांच्या जमिनीवर, घरांवर धरणे बांधली त्यांचं काय ? हा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. ज्यांनी आपल्या जमिनी सरकारला दिल्या, ज्यांची घरे धरणाखाली गेली त्यांना मात्र त्याच सरकारच्या दाराच्या पायऱ्या झिजवाव्या लागत आहेत.

जीवन जगण्यासाठी ज्या महत्वाच्या गोष्टींची आवश्यकता असते त्या गरजाही सरकार पूर्ण करीत नाही. त्या गरजा समस्येच्या रूपाने दत्त बनून धरणग्रस्तांच्या समोर उभ्या आहेत. धरणे बांधताना सरकार अनेक अश्वासनं देते. पण ती अश्वासने पूर्ण होत नाहीत. याचे प्रत्यंतर आज प्रसिद्ध होणाऱ्या अनेक दैनिकातील बातम्यांवरून पहावयास /वाचावयास मिळते. अशीच एक बातमी दि. २३ आक्टोबर २००१ च्या दैनिक पुढारीमध्ये काळम्मावाडी धरणग्रस्तांची कैफियत प्रसिद्ध झाली. यामध्ये प्रा. सुनील डेळेकर म्हणतात - "जगायचं कशासाठी आणि कुणासाठी ? जगावं म्हटलं तर कमीत कमी अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांपासून आम्ही वंचित असलेली माणसं. आता न्याय मागण्यांसाठी आंदोलन करण्याची आमच्यात ताकद नाही. मरण परवडेल; पण जगणं परवडत नाही. जगण्याची इच्छाच मावळत चालली असल्याची प्रतिक्रिया या विस्थापित धरणग्रस्तांची आहे."

या विधानावरून जीवन जगण्यासाठी कमीत कमी लागणाऱ्या गरजाही सरकारकडून पूर्ण होत नाहीत हे येथे स्पष्टच होते. या धरणग्रस्तांना मूलभूत सोयी अभावी वनवासी पद्धतीने जीवन जगण्याची वेळ येते. या धरणग्रस्तांची एक समस्या नाही. अनेक समस्या आहेत. यामध्ये घर, शेतजमीन, नोकरी, आरोग्य, पाणी, रस्ते, लाईट, शिक्षण, विवाह इत्यादी. यातील एकाही समस्येची पूर्तता सरकारकडून वेळेत पूर्ण केली जात नाही. यामुळे धरणग्रस्तांना आपले जीवन नकोसे झाले आहे. या धरणग्रस्तांच्या समस्येपैकी बानगेच्या वसाहतीत



Scanned by CamScanner

शिक्षणासाठी मुले आहेत मात्र शाळा नाही. हे दि. ७ मे २००२ च्या दैनिक सकाळमधील बातमीवरून स्पष्ट दिसते. हीच शाळेची समस्या पुन्हा एकदा दि. २३ ऑगस्ट २००४ रोजीच्या दैनिक सकाळमधून पुन्हा प्रसिद्ध झाली. त्या शाळेची कौले, फरशा, दारे, गज, खिडक्या यांची पडझड झाली आहे. म्हणजे साधी शाळेच्या इमारतीची समस्या दोन वर्षे सुटत नाही, याच्या इतके दुर्दैव कोणते असावे ? आजघडीला तरी ती समस्या सोडविली आहे का ? आपणासमोर प्रश्न चिन्ह उभे राहते. काळम्मावाडीचे ६०० घरं असलेले सर्व धरणग्रस्त बानगेतील ता. कागल वसाहतीत राहतात. याच धरणग्रस्तांना पिण्याच्या पाण्याची समस्या होती. ही समस्या ३ जानेवारी २००२ रोजी दै. सकाळमधून प्रसिध्द झाली. मात्र ही पाणी समस्या सोडविली गेली. पण धरणग्रस्तांना यासाठी तब्बल ५ वर्षे झगडावे लागले, तेंव्हा त्यांना न्याय मिळाला.

वडगावजवळ (ता. हातकणंगले) निवळे येथील वसाहतीची व्यथा दै. सकाळ मधून प्रकाशित झाली. या बातमीमध्ये वसाहतीत १९९८ पासून ८६ कुटूंबे शासनाच्या मदतीशिवाय काबाडकष्ट करून कसेबसे जीवन जगत असल्याचे दिसते. यांना घरे बांधण्यासाठी कर्जापोटी ८ हजार रूपये दिले गेले. यानंतर मात्र या वसाहतीकडे दुर्लक्ष झाले. अधिकारी लोक येतात, धरणग्रस्तांना अश्वासने देतात आणि निघून जातात. यामुळे या लोकांना जीवन कंठणे अवघड झाले आहे. यांनी पाण्यासाठी आंदोलने केली. शाळेत मुलांना शिकविण्यासाठी शिक्षकाची मागणी केली. अस्वच्छतेमुळे आरोग्यावर परिणाम होऊ लागला. विजेची मागणी केली. एक ना दोन अनेक समस्या त्यांच्यापुढे उभ्या आहेत. याच वीज समस्येवर एक वृद्ध धरणग्रस्त म्हणतो - "आम्हाला अंधार दिला, मुलांना तरी उजेड द्या, एक पिढी अशीच गेली, दुसरी तरी व्यवस्थित जगू द्या " हीच एक मागणी या धरणग्रस्तांची दिसते. अशा अनेक बातम्या आपणास वाचावयास मिळतात. ' एक तप उलटले तरीही धरणग्रस्त गावाची झाडाझडती सुरूच ' या शिर्षकाखाली दूधगंगानगर कावणे (ता.करवीर) येथील पुनर्वसित गावाच्या अनेक समस्यांचा लेख प्रसिध्द झाला. यामध्ये जीवनावश्यक गोष्टींपासून ते अंत्यविधीपर्यंतच्या (स्मशानभूमी) समस्या मांडल्या आहेत.

या धरणग्रस्तांच्या समस्या फक्त दैनिक वृत्तपत्रातूनच प्रसिद्ध होतात असे नाही. तर याची दखल मराठी साहित्यानेही घेतली आहे. कांही लेखकांनी कादंबरीच्या माध्यमातून धरणग्रस्तांच्या समस्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये बा. सी. मर्ढेकरांची 'पाणी', स. ग. यादव यांची 'बुडणारा गाव', रवी मिश्रा यांची 'मोहोळ' (हिंदी) वामन पात्रीकरांची 'जगबुडी', प्रा. चंद्रकुमार नलगे यांची 'देवाची साक्ष', विश्वास पाटील यांची



Scanned by CamScanner

'झाडाझडती' इत्यादी कादंबऱ्यांचा समावेश होतो. वरील कादंबऱ्यांतील 'देवाची साक्ष' व 'झाडाझडती ' या दोन कादंबऱ्या खऱ्या अर्थाने धरणग्रस्तांच्या समस्या रेखाटताना दिसतात. या दोन कादंबऱ्यांमध्ये प्रामुख्याने पुढील समस्या दिसतात -

(१)जमीन समस्या, (२)आरोग्य समस्या, (३)पाणी समस्या, (४) आर्थिक समस्या, (५)स्मशानभूमी समस्या, (६) गाव देवळाची समस्या, (७) शिक्षणाची समस्या, (८)विवाह समस्या, (९)नोकरी समस्या, (१०) वीज समस्या इत्यादी. या समस्या वरील दोन कादंबऱ्यांतून कशा मांडल्या आहेत त्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे आहे.

प्रामुख्याने धरणग्रस्तांच्या जमिनी धरणाखाली जातात. त्या मोबदल्यात त्यांना दुसऱ्या जमिनी मिळत नाहीत. मग ती वस्तीसाठी असू दे अथवा शेत जमीन असू दे. या जमिनीसाठी त्यांना खूप संघर्ष करावा लागतो. 'देवाची साक्ष' मध्ये नाना रक्ताचं पाणी करून जमीन पिकवायाचा तीच जमीन धरणाखाली जाते हे त्याला सहन होत नाही. प्रसंगी रखमाच्या प्रश्नाला उत्तर देताना नाना म्हणतो, "मी तुझ्यासारखा जगतकरी नाही. जिथं जमिनी गेल्या, काळजाचं तुकडं गेलं, जिथं सोन्यासारखी पीक उभं केलं, धान्याच्या राशी लावल्या तिथं पैशासाठनं डबा पुढं करू." (पृ. ७४ देवाची साक्ष) या त्याच्या उत्तरातून नानाचा स्वाभिमान दिसतो. व यातून त्याच्या मनातील दुःखही दिसते. 'झाडाझडती' कादंबरीत अनेकांना नियमानुसार जमिनी मिळत नाहीत. कुशापाला १०० एकरांच्या बदल्यात तीन-चार एकराचा वाटा मिळतो. तर आवडाक्का व हैबती यांना मुरमाड व बाभळीची झाडं असलेली नापीक जमिन मिळते. नापीक जमिनी ते पिकवितात. मात्र राघू हा त्या जमिनीचा मालक त्यांना त्रास देवून जमीन सोडण्यास भाग पाडतो. इकडे दत्तू करवंदे सारखी दुष्ट प्रवृत्तीची माणसे स्वतःची आई मेली हे दाखल्याने सिद्ध करून तिच्या वाटणीचे ३५,०००/- रूपये घेतात व दुसरी बानुबाई उभी करून तिचा जमिनीचा वाटाही घेतात. या जमिनीच्या वादामध्ये हैबतीचा खून होतो आणि तो दारू पिऊन मेला हे सत्ताधारी लोक सिद्ध करून फाईल बंद करतात. याबरोबरच नवीन गावठाण्याला जनावरांसाठी गायरान जमीन मिळत नाही. परिणाम जनावरे येईल त्या किंमतीला विकतात. गावकरी पदरात मातीच बांधून न्यायची तर हुज्जत कशासाठी घालायची ? असं म्हणून भरल्या डोळयांनी घरी परततात.

नवीन गावठाण्यात सांडपाण्याची सोय नसल्याने तेथे दलदलीचे साम्राज्य निर्माण होते. परिणामी साथीचे रोग पसरतात. या रोगामुळे लहानांपासून ते म्हाताऱ्यापर्यंत अनेक लोक दगावतात. गावात दवाखान्याची सोय नाही त्यामुळे औषधोपचार होत नाही. सदाची लहान बहीण तापाच्या निमित्ताने औषधाविना मरण पावते. त्यावेळी सदा म्हणतो -" तापानं



Scanned by CamScanner

फणफणलीं. तिचं ओठातलं दूध पार सुकून गेले. डोळे पांढरे फट पडले. बाहुल्या उगीच नाचल्या, पापण्या जडावत गेल्या. शेवटी तिनं आपलं मिटमिटी डोळं मिटवून आईच्या मांडीवर आपलं प्रेत टाकून दिलं." (पृ. ८ देवाची साक्ष) गुंडा मालुसरेची म्हातारी जेव्हा आजारी पडते तेव्हा तो म्हणतो - "माजी म्हातारी पंधरा दीस तापानं हुमतीया. लै हाल चाललतं ह्या रानात. आपल्या वाडीत एक डागदर आन एक दवाखाना पायजेल."(पृ. २१४ झाडाझडती) या गैरसोयीपाई औषध आणायला गेलेल्या खैरमोडे गुरूजीवर मारहाणीचा प्रसंग येतो.

औद्योगिक विकासासाठी धरण बांधून पाणी साठविले जाते. पण धरणग्रस्तांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. पाण्यासाठी त्यांना वणवण करावी लागते. जांभळीकर आपल्या पुनर्वसनाची जागा बघतात, तेव्हा आपापसात कुजबुजू लागतात -" का करायचं रं हिकडं येऊन? टाचा घासून प्याला तरी पाणी मिळंल का ?"(पृ. ५१ झाडाझडती) इकडे द्रुपदा ओढ्यातलं झरं करून पाणी पिण्यासाठी आणते. ते पाणी पिऊ नका असे गुरूजी सांगतात. तेंव्हा द्रुपदा म्हणते - "काय करायचं ? बिन पाण्याच कसं जगायचं गुर्जी ? च्याऽला तरी नगो का ?" (पृ. ३१७ झाडाझडती) याच दुषीत पाण्याने अनेकांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो आणि पांडबाचा राजू आजारी पडतो. तोही मरतो. या पिण्याच्या पाण्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

माणसाचा जीवन चरितार्थ चालविण्यासाठी आर्थिक सबलता लागते. ती जर नसेल तर माणसाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. गावठाणे उठविल्याने धरणग्रस्तांच्यात होणारा रोजचा रोटीबेटीचा व्यवहार संपुष्टात येतो आणि आर्थिक स्थिती नाजुक होते. पैसा नाही म्हणून अनेक कुटुंबांची वाताहत सुरू होते. प्रसंगी त्यांना उपाशी रहावे लागते. आपल्या कुटुंबाला सांभाळण्यासाठी नाना जीवापाड जपलेली खिल्लारी बैलजोडी विकतो. चार दिवस आनंदी जातात व पुन्हा समस्या निर्माण होतात. याला कंटाळून नाना घर सोडून जातो. सदा हा पैशासाठी वयाने लहान असतानाही रस्त्यावर डांबर ओतण्याचे काम करतो, तर तुकाआबा या वारकऱ्याला अभंग म्हणण्याऐवजी खाणीवर काम करावे लागते. (देवाची साक्ष )

धरणग्रस्तांची जीवंत असताना झाडाझडती सुरू असतेच पण मेल्यावर त्यांची झाडाझडती संपत नाही. गावठाण्यात मेलेल्या माणसाला जाळण्यासाठी स्मशानभूमी नसते. नियमाने गावठाण्यात स्मशानभूमी असावीच लागते. पण या धरणग्रस्तांना स्मशानभूमी मिळत नाही. कासारणीची मुलगी बाळंतपणातच मरते हे वर्णन करताना लेखक चंद्रकुमार नलगे लिहितात, - "वडावरच्या उलट्या जगातही फडफड झाली. संध्याकाळी दूर नदीच्या काठावर प्रेत जळत होतं, त्याचं उस्तं, रानभर पसरलं होतं..... विटीदांडूच्या माळावर जळत्या सरणाच्या



Scanned by CamScanner

भगभगीत प्रकाशात विटीदांडूच्या खेळातला एक डाव संपला होता." (पृ. ६९ देवाची साक्ष) 'झाडाझडती' मध्ये तर घरासमोरच प्रेतं जाळावी लागतात. त्यामुळे मुलं रात्रीची घाबरून उठत व आजारी पडत. खैरमोडे गुरूजी स्मशानभूमी मिळविण्यासाठी देशमुख साहेबाला म्हणतात - "ठीक आहे साहेब, मघापासून आम्ही जगायचं बोलत होतो. आता आमची मरायची सोय कुठं करता बोला ? नियमानुसार प्रत्येक गावठाणात स्मशानभूमी पाहिजे. मग आमच्या गावात स्मशान का नाही ? आम्ही मरायचं कुठं ?सांगा तुम्हीच साहेब." (पृ. २७४ झाडाझडती) या गोष्टीवरून धरणग्रस्तांना स्मशानभूमीसाठी किती झगडावे लागते आहे याची कल्पना येते. पांडूचा राजा मरतो तेव्हा त्याला गावठाण्यातच दफन केले जाते. पुढे त्याच्याच शेजारी पांडूचं (आजोबा)सरण रचलं जाते. हे सर्व गाव डोळे उघडे ठेवून बघत होता. पण काही करता येत नव्हते. आयुष्यभर धरणग्रस्तांच्या मागण्यासाठी खैरमोडे गुरूजी स्वत: झिजतात. पण त्यांना न्याय मिळत नाही. खैरमोडे गुरूजी मरण पावतात. तेव्हां त्यांच्या प्रेतालाही न्याय मिळत नाही. गुरूजींचं प्रेत सरणावर ठेवण्यास कधी जागा मिळणार या प्रतिक्षेत सारा गाव पावसात वाट बघत असतो. कारण त्या सरणाच्या जागी राजकारणी पार्टीच्या पोरट्याचं प्रेत जळत असतं. एकदंरीत काय तर धरणग्रस्तांची जीवंतपणी झाडाझडती सुरू असते आणि मेल्यावरही.

स्मशानभूमी बरोबरच गावठाण्यात देऊळ नसते. त्यासाठी धरणग्रस्तांना झगडावे लागते. प्रामुख्याने ग्रामीण भागातील लोकांची देवावर फार श्रध्दा असते. गावात जी काही घटना घडते ती देवाच्या साक्षीनेच घडते असा विश्वास असतो. 'देवाची साक्ष' मध्ये देवाला मध्यवर्ती स्थान दिलेले आहे. खेड्यामध्ये श्रध्दा, अंधश्रध्दा रूढ असतात. या संदर्भात सदा गाव उठताना एके ठिकाणी म्हणतो, - "ज्याची करूणा झाली की शेतं भातं पिकायची, झाडंझुडपं फळाफुलायची, सारा बहरच बहर यायचा, आनंदाची कारंजी उडायची. त्याच देवाला वैराण माळावरनं माणसाच्या नशिबाला नशिब बांधून फरफटत यावं लागणार होतं." (पृ. २१ देवाची साक्ष) जिद्दीने प्रयत्न करून देउळ बांधल जातं. पण ते मातीचं. जुन्या गावातील देवळाचं समाधान या देवळात नव्हते. मातीचं देउळ असल्याने ते लवकर खराब होते. आवडाक्काच्या मुलावर जेंव्हा संकटं येतात तेंव्हा आवडाक्का म्हणते- "आये ऽ पोरावरची काळी नदर सोड. लेकरानं लै वनवास काढलाय. जिन्यापायी मरण भोगलं. झाडा दिलां त्येच्या केसाला धक्का लागला तर तुजा देव्हारा जाळीन ऽ यमाचा रेडा आडवीन. त्याची शिंग पोटात घीन पर माज्या बाळाला धका नाय लागू द्याची. ( पृ. ४८४ झाडाझडती) या विधानावरून लोकांची गावदेवीवर किती श्रध्दा असते हे स्पष्ट होते. गावातील देउळ म्हणजे ग्रामीण माणसाचा आत्मीयतेचा भाग असतो.

खेडेगावात मुळातच शिक्षणाचा प्रसार कमी झालेला आहे. त्यातच नवीन गावठाण्यात



Scanned by CamScanner

शाळा मिळत नाही. कांही ठिकाणी शाळा आहे तर शिक्षण नाही अशी परिस्थिती दिसून येते. चौथी पास झाल्यावर पाचवीला मोठ्या शाळेत जाणार म्हणून सदा आणि वैजू खूप आनंदी असतात, पण धरणाचं काम सुरू होतं आणि त्या धरणाबरोर त्यांचं शाळा शिकण्याचं स्वप्न मातीमोल होतं. नानाचं लक्ष जर घरात असतं तर सदाचं शिक्षणाचं स्वप्न खरं पूर्ण झालं असतं. झाडाझडतीमध्ये खैरमोडे गुरूजी हे जातीचे /हाडाचे शिक्षक आहेत. त्यांना शिक्षणाचं महत्त्व माहित असल्याने या शिक्षणापायी अज्ञानाचा फायदा घेवून सावकार लोक गरिबांना कसे लुबाडतात, खोटी कागदपत्रे तयार करून जमिनी बळकावतात याची जाणीव आहे. गुरूजी प्रथमत: कोयना धरणाच्या भागात नोकरीस असतात. तेथील शाळा बंद पडल्याने ते जांभळी गावी आले होते. गरिबी आणि अन्यायाविरूध्द लढायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे धरणग्रस्त मुलांना पटवून सांगताना गुरूजी म्हणतात -" लेको, गेल्या जन्मातलं तुमचं पाप म्हणून तुम्ही धरणग्रस्तांच्या पोटी जन्माला आला. ह्या चिखलातून बाहेर पडायचं असेल तर तुम्हाला शिक्षणाशिवाय सतगत नाही." (पृ. ११० झाडाझडती) इतकेच नव्हे तर गुरूजी म्हातारे झाले तरी मुलांना म्हणायचे - " बाळानों लै शिका, आपल्यासारख्या बुडत्यांना शिक्षणाच्या काडीचाच आधार. जर तुमच्या बापांना वाचता येत असतं कायद्याच्या आणि वायद्याच्या मधली गाळलेली अक्षरं कळत असती तर आमच्या जन्माची फरफट कशाला झाली असती ऽ !" (पृ. ४४९ झाडाझडती) यावरून हे स्पष्ट दिसते की धरणग्रस्तांच्या मुलांना शिक्षणासाठी शाळा नसते. असलीच तर पडकी असते. नाहीतर शिक्षक उपलब्ध नसतात. याचा सविस्तर उल्लेख सुरूवातीस केला आहे. या अनेक कारणांनीच धरणग्रस्तांच्या मुलांना शिक्षण घेता येत नाही.

धरणग्रस्तांची वस्ती उठल्याने त्यांना घरदार रहात नाही. परिणामी त्यांची लग्नं होत नाहीत. या धरणग्रतांचे विवाह होत नसल्याने शारीरिक भूक भागविण्यासाठी 'सलमा' (देवाची साक्ष) सारख्या व्यक्तिरेखा कोणत्याही थराला जाताना दिसतात. प्रसंगी लहान सदाका निवडूंगाची बोंड खायला देवून स्वत:च्या ओठावरून जीभ फिरवण्यास सांगते. व नंतर ती खाणीचा मालक चष्मेवाला याच्या आहारी जाते. एकीकडे हे चित्र दिसते तर दुसरीकडे झाडाझडती मधून धरणग्रस्ताची मुलगी रूपा हैबतीबरोर लग्नास नकार देते. रूपा ही हैबतीच्या मामाची मुलगी असून सुध्दा ही समस्या उद्‌भवते. हैबतीच्या स्थळाविषयी रूपा म्हणते - "त्येंच्याबद्दल तक्रार न्हाय माझी. पण ती जांभळी सगळी धरणात बुडणार, तिथली माणसं दरवेशावानी गाव सोडून परमुलखात जाणार भिनाभिकाऱ्यावानी भीक मागीत! मग मी बी जाउ का तारंवरनं उड्या मारायला ऽऽ डोंबाऱ्याच्या पोरीवानी ?" (पृ. ८२ झाडाझडती ) यावरून

विवाहाची किती गंभीर समस्या आहे हे स्पष्ट होते.

माणसाला जीवन जगण्यासाठी व्यवसायाची गरज असते. त्याशिवाय तो आपला चरितार्थ भागवू शकत नाही. गाव उठवल्याने या धरणग्रस्तांचे सर्व व्यवसाय बंद पडतात. परिणामी त्यांची उपासमार होते. या कारणावरून सरकारने सरकारी खात्यात कांही टक्के धरणग्रस्तांच्या मुलांना नोकरीत सामावून घेवू असे सांगितले. मात्र त्या नियमानुसार नोकर भरती होत नाही. कांही वेळा नोकरीत घेतले तर कायम होउ देत नाहीत. हे हैबती या व्यक्तिरेखेवरून स्पष्ट होते. हैबतीला १८० दिवस पूर्ण न भरल्याने त्याला नोकरीवरून काढले जाते. हैबती नियमीत नोकरीवर यायचा पण अधिकारी लोक (सत्ताधारी गटातील) सही करण्यासाठी नोंद पुस्तक देत नाहीत. परिणामी नोकरीचे सलग १८० दिवस पूर्ण भरत नाहीत. ५ % जागा धरणग्रस्त मुलांच्यासाठी भरून घ्यायच्या असतात पण सत्ताधारी लोक त्यांच्याच लोकांची भरती करतात. नोकरी संदर्भात खैरमोडे गुरूजी देशमुख साहेबाला म्हणतात, - "तिकडं जायचं आम्हाला कारणच काय साहेब ?सेवा योजनाचा कौल असण्याची गरज नाही. धरणग्रस्तांची पोरं सरळ सेवेत घ्या हा शासनाचा जी. आर. आहे. हा घ्या साहेब." (पृ. ४०२-४०३ झाडाझडती) इतके आरशासारखे स्पष्ट असून देखील धरणग्रस्तांच्या लोकांना नोकरीत समावून घेतले जात नाही.

वरील समस्याशिवाय वीज समस्या व इतर अनेक लहान-सहान् समस्या आहेत. सर्वांचा उल्लेख येथे न करता प्रमुख समस्याच आहेत. नवीन गावठाण्यात वीजेचे पोल उभे केले जातात. पण विजपुरवठ्यासाठी तारा टाकल्या जात नाहीत. परिणामी लोकांना अनेक वर्षे अंधारात रहावे लागते. याचे प्रत्यंतर लेखाच्या सुरूवातीस बातमीवरून प्रत्ययास येते. अशा अनेक प्रकारच्या लहान मोठ्या समस्या धरणग्रस्तांच्या समोर उभ्या असतात. या सर्व समस्या कधी सुटणार का ? खऱ्या अर्थाने या धरणग्रस्तांना न्याय मिळणार का ? अनेक वेळा चर्चा होतात, अधिवेशने होतात, धरणग्रस्तांना आश्वासने दिली जातात, मात्र ती कागदावरच राहतात. हाल मात्र फक्त धरणग्रस्तांचेच होतात. धरणे बांधली पाहिजेत, त्याशिवाय विकास नाही. हे जरी खरे असले तरी, ज्या ठिकाणी धरण बांधणार त्याठिकाणच्या लोकांचे प्रथमत: योग्य पध्दतीने पुर्नवसन केले पाहिजे. त्यानंतर धरणे बांधली पाहिजेत. प्रथमत: त्यांना आश्वासने द्यायची आणि नंतर त्यांच्याकडे पाठ फिरवायची हे कुठे पर्यंत चालणार ?.......या धरणग्रस्तांना आपल्या न्यायासाठी, हक्कासाठी किती पिढ्या घालवाव्या लागणार, व आंदोलने करावी लागणार, मोर्चे काढावे लागणार, या घटकाशिवाय त्यांना पर्याय आहे का ? याच मोर्चे आणि आंदोलना विषयी एका चर्चेत विश्वास पाटील म्हणतात, -



Scanned by CamScanner

"धरणे व्हायला हवीतच. विकासाचा मार्ग रोखून धरण्याच्या प्रयत्नाचं कुणीही समर्थन करणार नाही. पण त्याचबरोबर धरणग्रस्तांचे योग्य पुनर्वसन लवकरात लवकर होईल यावरही भर द्यायला हवा, अन्यथा धरणे आणि आंदोलने ही साखळी दिवसेंदिवस भक्कम होत जाईल." ( दै. सकाळ बुधवार ११ एप्रिल २००१) हे वरील उद्गार आजच्या काळात तितकेच सत्य आहेत. कारण या समस्यांचे प्रत्यंतर आजही अनेक दैनिक वृत्तपत्रातून आपणास वाचावयास मिळते. हा प्रश्न कधी सुटेल का ? केंव्हा सुटेल? कोण सोडवेल ? का सोडविला जाणारच नाही ? फक्त प्रश्न चिन्ह दिसताहेत .

## संदर्भ ग्रंथ

१) 'देवाची साक्ष ':- प्रा. चंद्रकुमार नलगे. विशाखा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १५-३-१९७९

२) 'झाडाझडती' :- विश्वास पाटील, राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे आवृत्ती सातवी १९९८.

३) 'दैनिक सकाळ', पुढारी मधील बातमीची कात्रणं.



Scanned by CamScanner